# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

नवीन अभ्यासपाठयक्रम/विषय/विद्याशाखा/तुकडी व संशोधन केंद्र ई. करिता

## जाहीर प्रगटनाचा सविस्तर तपशील

(शासन निर्णय क्र एनजीसी २०१७/(२०८/१७)/मशि–४, दि. १३/०९/२०१७ अन्वये वृत्तपत्रातील संक्षिप्त जाहिर प्रगटनाचा सविस्तर तपशील)

संदर्भ: १) शैक्षणिक/संलग्न–०३/२०२३–२४/७८९ दिनांक : २३/०८/२०२३ रोजीचे जाहीर प्रगटन

२) उच्च तंत्र शिक्षण विभाग,मुंबई यांचे पत्र क्र. बृहत २०२३/प्र.क्र.५/विशि–५ दि. २५/१०/२०२३

संदर्भ क्र. २ च्या पत्रानुसार स्वा.रा.ती.म.विद्यापीठ, नांदेड हे शैक्षणिक वर्ष २०२४–२०२५ करिता विद्यापीठ कार्यक्षेत्रातील (नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर जिल्हा) संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम /विद्याशाखा/तुकडी व संशोधन केंद्र इत्यादी सुरु करण्यासाठी संबंधीत संस्थेकडून प्रस्ताव मागवित आहेत. सादर करावयाचे विहीत नमुन्यातील प्रस्ताव/आवेदनपत्र, शासन निर्णय परिशिष्टांसह विद्यापीठाच्या संकेतस्थळावर www.srtmun.ac.in यावर News / Circulars - Academic मध्ये उपलब्ध करून देण्यात येत आहे.

संस्था/महाविद्यालयांनी आवेदनपत्र/प्रस्ताव, सादर करतांना शासन निर्णयात नमुद परिशिष्ट 'अ' मध्ये विहीत केल्याप्रमाणे, विहीत शुल्कासह परिशिष्ट 'ब' नुसार आवेदनपत्र/प्रस्तावा सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे क्रमाने जोडुन विद्यापीठात सादर करण्याची अंतीम तारीख **दि. १५/११/२०२३** ही आहे. सर्व संबंधितास आवेदनपत्र / प्रस्ताव शनिवार (प्रथम/तिसरा), रविवार व इतर सार्वजनिक सुट्टया वगळून कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी दाखल करता येतील. अंतीम तारखेनंतर कोणतेही प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि. १३/०९/२०१७ व वेळोवेळीचे शासन निर्णय व निर्देश, विद्यापीठ अनुदान आयोग ( विद्यापीठाकडून महाविद्यालयांना संलग्निकरण ) विनियम २००९ नुसार नमूद केलेल्या विनियमातील तरतूदी संस्थेने संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी व संशोधन केंद्र इत्यादी साठीची मागणी करण्यापूर्वी विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या महाविद्यालयात नियमीत प्राचार्यांची नियुक्ती, विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांची यादी/संख्या, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची यादी, आवश्यक अकृषक जमीन, विहीत क्षेत्रफळ असलेल्या प्रशासकीय, शैक्षणिक आणि इतर इमारती, वीज, पाणी, होस्टेल, स्वच्छतागृह इत्यांदींची व्यवस्था, विनियमातील तरतूदीनुसार ग्रंथालय, व अभ्यासक्रमाशी संबंधीत पुस्तकांची संख्या, क्रिडांगण, प्रयोगशाळा, सभागृह, सुयोग्य फर्निचर, तासिकांसाठी खोल्यांची व्यवस्था, आर्थीक तरतुद, नॅक मुल्याकंन/पूनर्मुल्याकंन इत्यादी सर्व बाबींची पुर्तता करणे आवश्यक आहे. त्यामुळे संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी व संशोधन केंद्र यासाठी प्रस्ताव /आवेदनपत्र सादर करण्यापूर्वी संबंधीतानी याबाबत खातरजमा करून घ्यावी. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ नुसार संलग्नित महाविद्यालयात नवीन विषय/अभ्यासपाठयक्रम/विद्याशाखा/तुकडी व संशोधन केंद्र यासाठी प्रस्तावाच्या अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावरून प्राप्त करून ०३ (तीन) प्रतिमध्ये आवश्यक प्रक्रिया शुल्कासह दाखल करावा. (शुल्क तक्ता संकेतस्थळावर उपलब्ध आहे.) संलग्निकरण शुल्क तक्त्यातील ७ नंबर कॉलममधील प्रक्रिया शुल्क (Processing Fees) + प्रस्ताव शुल्क रु.२०००/– प्रमाणे भरणा करावेत. हे शुल्क डी.डी. द्वारे किंवा NEFT/RTGS द्वारे वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड IDBI बॅक, शाखा नांदेड, IFSC CODE-IBKL0000500 खाते क्रमांक ५००१०४०००००२८४२२ मार्फत स्विकारले जातील. याची नोंद घ्यावी. प्रस्तावासोबत परिशिष्ट 'ब' नुसार मुद्येनिहाय क्रमवार कागदपत्र जोडावीत त्यास अनु क्र. द्यावा व पताका लावावेत तसेच प्रस्तावासोबतच्या सर्व छायांकित पानांवर साक्षांकन असणे आवश्यक आहे.

संस्थेच्या प्राप्त प्रस्तावातील परिशिष्ट 'ब' नुसार छाननी समितीने पात्र केलेल्या प्रस्तावाकरिता महाविद्यालयास पाहणी समिती पाठविण्यात येईल. सबब,वरील प्रमाणे सर्व संबंधीतानी नोंद घ्यावी.

**सुचना** : प्रस्तुत विद्यापीठाच्या जाहीर प्रगटन संदर्भ क्र. १ शैक्षणिक/संलग्न–०३/२०२३–२४/७८९ दिनांक : २३/०८/२०२३ नुसार संलग्नीत महाविद्यालयांनी नवीन विषय, अभ्यास पाठयक्रम, विद्याशाखा, तुकडी, संशोधन केंद्राकरिता प्रस्ताव सादर केलेले आहेत. त्यावर कार्यवाही सुरू आहे त्यामुळे पुन्हा तेच प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

संदर्भ शैक्षणिक/संलग्न–०३/२०२३–२४/1133
दिनांक : २६/१०/२०२३
स्थळ : नांदेड

कुलसचिव
कुलसचिव
स्वामी रामानंद तीर्थ
मराठवाडा विद्यापीठ,नांदेड